**MHKO**070000592023

<u>नियमीत दिवाणी दावा क्र. १८/२०२३ मधील</u>
<u>निशाणी क्र. २० खालील आदेश</u>
**(भाऊसो कावरे वि. दादा क–याप्पा )**

**०१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं.६ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला 'विना कैफियत दावा चालविणेचा आदेश रद्दबातल करुन लेखी कैफीयत व नि.क्र.५ चे म्हणणे दाखल करून घेण्यासाठी केलेला आहे.

**०२.** प्रस्तुत प्रतिवादी नं. ६ यांनी असे कथन केले आहे की, त्यांना दाव्याचे समन्स लागू झाल्यानंतर ते दावेकामी हजर झाले परंतु दावा मिळकतीबाबत मे.तहसिलदार, मंत्रालय, मुंबई वगैरे महसुली कामे चालू आहेत. त्यामुळे त्याची कागदपत्रे मुदतीत उपलब्ध झाली नाहीत. सदर कारणांमुळे प्रतिवादी यांना ९० दिवसांत कैफियत व नि.क्र.५ च्या अर्जास म्हणणे देणेकरीता ७ महिन्यांचा विलंब झालेला आहे. तरी न्यायाच्या हेतूस्तव व काम गुणदोषावर चालविणेसाठी झालेला विलंब माफ होवून आणि विनाकैफियत व विना म्हणणेचा आदेश रद्द करुन प्रस्तुत प्रतिवादीनी दिलेली कैफियत व म्हणणे याकामी दाखल करुन घेणेविषयी नम्र विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

**०३.** वादी यांनी त्यांचे म्हणणे सदर अर्जावरच दाखल करुन असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज ब–याच विलंबाने दिलेला असून कोणतेही संयुक्तीक कारण विलंबासाठी दिलेले नाही. सबब अर्ज दंड करुन नामंजूर करणेत यावा अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

**०४.** उभयपक्षातर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दाव्यातील सर्व कागदपत्रे पाहिली. प्रस्तुतचा दावा कायम मनाई होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी नं.६ यांना प्रस्तुत दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर ते दावेकामी दि.२३/०२/२०२३ रोजी हजर झाले. प्रतिवादी यांनी समन्स प्राप्त

झालेपासून ९० दिवसांमध्ये दावेस कैफियत व नि.क्र.५ ला म्हणणे दाखल केले नाही म्हणून प्रस्तुत प्रतिवादी यांच्याविरुध्द विना कैफियत प्रकरण चालविणेत आले. प्रतिवादी यांनी ब–याच विलंबाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्जास आक्षेप घेतलेला आहे. प्रतिवादी यांनी विलंबाचे दिलेले कारण योग्य व संयुक्तीक नाही. अर्जामध्ये नमूद केलेले कारण संयुक्तीक नसले तरी दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी यांना दंड आकारुन संधी देणे न्यायसंगत वाटते. जर तसे केले नाही तर त्यांच्या बचावाचे दरवाजे बंद होतील व सदरील दावा हा गुणावगुणावर निकाली लागणार नाही व त्यांच्या कायदेशीर अधिकारावर गदा येईल, तरी न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत प्रतिवादी यांना बचावाची संधी देणे विधीसंगत वाटते. सदर प्रकरणातील वस्तुस्थिती व दाव्याचे स्वरूप पाहता, अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. करिता खालील आदेश पारीत करण्यात येतो –

**– आदेश –**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.२०) हा रक्कम **रु.५००/– (अक्षरी र.रु.पाचशे फक्त)** वादी यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाची पुर्तता केल्यानंतर प्रतिवादी नं.६ यांची लेखी कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावी.

३. खर्चाची पुर्तता पुढील तारखेस किंवा तत्पुर्वी करावी.

सही/–

दि.२५/०१/२०२४ **(रोहिणी अ. जाधव)**

जयसिंगपूर. २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri.R.L.Mane. |
| Name of Court | 2nd Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 25/01/2024. |
| Judgment/order signed by the PO on | 25/01/2024. |
| Judgment/order uploaded on | 01/02/2024. |

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri.R.L.Mane. |
| Name of Court | 2nd Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 18/12/2023. |
| Judgment/order signed by the PO on | 18/12/2023. |
| Judgment/order uploaded on | 08/01/2024. |